14 FEB 2026

पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Smart कोल्हापूर
पुण्यनगरी

कोल्हापूर : शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६

# सूर्यप्रतापी राजा शिवछत्रपती...



कोल्हापूर : मकर संक्रांतीपासून सूर्याचे उत्तरायण सुरू आहे. या उत्तरायण प्रवासादरम्यान येथील शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या पाठीमागे मावळतीच्या सूर्याने तेजांकित प्रभामंडळ प्रदान केले आहे. हे छायाचित्र टिपले आहे विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी.

14 FEB 2026

पुण्यनगरी

# डॉ. शरद बनसोडे यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धांसाठी एआययू ऑब्झर्व्हर म्हणून निवड झाली. या स्पर्धा दि. १० ते १४ फेब्रुवारी दरम्यान जैन विद्यापीठ, बंगळूर येथे होत आहेत. अखिल भारतीय विद्यापीठ महासंघ, नवी दिल्ली यांच्यामार्फत त्यांची निवड करण्यात आली. या स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघ निवडला जातो.

14 FEB 2026

पुण्यनगरी

# रसायनशास्त्र विभागातर्फे आज परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (दि. १४) 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत उपाय' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. झेक रिपब्लिक येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. इंद्रजित घोष यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन होणार असून, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती अधिविभागप्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी दिली. परिषदेत सुमारे ३५० पेक्षा अधिक देश-विदेशांतील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी होणार आहेत. प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी, मुंबई, डॉ. दिनेश सावंत, एनसीएल, पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन, आयआयटी, मंडी आदी शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

14 FEB 2026

पुण्यनगरी


# रसायनशास्त्र विभागातर्फे आज परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (दि. १४) 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत उपाय' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. झेक रिपब्लिक येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. इंद्रजित घोष यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार असून, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती अधिविभागप्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी दिली. परिषदेत सुमारे ३५० पेक्षा अधिक देश-विदेशांतील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी होणार आहेत. प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी, मुंबई, डॉ. दिनेश सावंत, एनसीएल, पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन, आयआयटी, मंडी आदी शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

14 FEB 2026

लोकमत

# सूर्यप्रतापी राजा शिवछत्रपती, तेज तुझे अमर दिव्य ज्योती...



मकरसंक्रांतीपासून सूर्याचे उत्तरायण सुरू आहे. या उत्तरायण प्रवासादरम्यान कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या पाठी मावळतीच्या सूर्याने तेजांकित प्रभामंडळ प्रदान केले आहे.

छाया : डॉ. आलोक जत्राटकर

14 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



मकरसंक्रांतीपासून सूर्याचे उत्तरायण सुरू आहे. या उत्तरायण प्रवासादरम्यान शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या पाठी मावळतीच्या सूर्याने तेजांकित प्रभामंडळ प्रदान केले. (छाया - डॉ. आलोक जत्राटकर)

14 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

• वर्ष : १ • अंक : १४२ • पाने : १० मूल्य ₹ ५ पो.र.नं. SGL/25/2025/2027 RNI No. MAHMAR/2003/11365

दैनिक **जनप्रवास** बातम्यांचा राजा

कोल्हापूर । शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ सांगली, कोल्हापूर, सातारा



## मावळतीच्या सूर्यकिरणांनी उजळला शिवछत्रपतींचा इतिहास

सूर्यास्ताच्या सोनेरी प्रकाशात इतिहास, सन्मान आणि शिस्त यांचा सुरेख संगम या क्षणात टिपला गेला आहे. अश्वारूढ शिवछत्रपतींचा तेजस्वी पुतळा स्वाभिमानाची उंची सांगत उभा असून, समोरची भव्य वास्तू छत्रपती शिवाजी विद्यापीठाचा लौकीक, स्थिरता आणि शैक्षणिक बांधिलकी अधोरेखित करते. हिरव्या लॉनवर पसरलेली शांतता, आकाशात मावळतीची उब आणि सावल्यांतून उमटणारी शौर्याची आठवण हे दृश्य काळाला थांबवते. परंपरा आणि आधुनिकतेचा हा संगम प्रेरणा देणारा आहे; जिथे इतिहासाची जाणीव वर्तमानाला दिशा देते आणि उद्याच्या वाटचालीस आत्मविश्वास मिळतो.

14 FEB 2026

जनप्रवास

# अतुल देऊळगावकर यांचे विद्यापीठात सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांचे सोमवार १६ रोजी सकाळी ११ वा. 'साहित्य, संस्कृती, विज्ञान, माध्यमे आणि शाश्वत विकास' या विषयावर व्याख्यान आहे. कार्यक्रम अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आहेत. हिंदी विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन आणि लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होत आहे. हिंदी विभाग प्रभारी प्रमुख प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर आणि विनायक देसाई उपस्थित राहणार आहेत.

14 FEB 2026

जनप्रवास

# राष्ट्रीय विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धेसाठी डॉ. बनसोडे निरीक्षक

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक तसेच आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल प्रा. डॉ. शरद बनसोडे यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धांकरिता एआययू निरीक्षक म्हणून निवड झाली आहे. जैन विद्यापीठ, बेंगलोर येथे १० फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी दरम्यान या स्पर्धा होत आहे.



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धांकरिता अखिल भारतीय विद्यापीठ महासंघ, नवी दिल्ली यांच्या मार्फत एआययू निरीक्षक डॉ. बनसोडेंची म्हणून निवड झाली आहे. या स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरिता भारतीय संघ निवडला जातो. डॉ. शरद बनसोडे यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द, बास्केटबॉलवर गाढा अभ्यास, तसेच अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू कोल्हापूरमध्ये आणि महाराष्ट्रासाठी घडवले आहेत. याची दखल घेत ही जबाबदारी डॉ. शरद बनसोडे यांना सोपविली आहे.

14 FEB 2026

सकाळ

# बी. एड. अभ्यासक्रमासाठी २४ पर्यंत अर्ज भरण्याची मुदत

कोल्हापूर, ता. १३ : एम. एड., बी. एड. अभ्यासक्रमांच्या २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी २४ फेब्रुवारीपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे.

एम. एड. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक पात्रता कोणत्याही शाखेतील पदवीधर आणि डी.एल. एड. किंवा बी. एड. उत्तीर्ण असणे अथवा अंतिम वर्षाची परीक्षा दिलेली आहे, असे विद्यार्थी आणि बी. एड-एम. एड. (एकात्मिक) या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या अंतिम परीक्षा दिली, असे विद्यार्थी शासनाच्या स्टेट कॉमन एंट्रान्स टेस्ट सेल महाराष्ट्र स्टेट मुंबई यांच्याद्वारे घेण्यात येणाऱ्या पात्रता परीक्षेद्वारे प्रवेश घेऊ शकतात.

जनसंपर्क कक्ष
14 FEB 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाला धोका नाही

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाला तडे गेल्याची तक्रार झाली. त्याची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी आज या मार्गाची पाहणी केली. त्यात या मार्गाला धोका नसल्याची माहिती या विभागाने पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रत्यक्ष पाहणीनुसार या रस्त्याच्या पृष्ठभागावर आढळलेल्या भेगा या आकुंचन भेगा असून, संरचनात्मकदृष्ट्या कोणताही धोका आढळलेला नाही. या रस्त्याच्या कामासाठी करारानुसार कंत्राटदारावर दहा वर्षांचा दोष दायित्व कालावधी लागू असून, आवश्यक त्या दुरुस्तीची कार्यवाही संबंधित कंत्राटदारातर्फे करण्यात येणार आहे. याबाबत तांत्रिक तपासणी सुरू असून, आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारत प्रकल्प उपविभागाच्या उपविभागीय अभियंता हेमा जोशी यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

14 FEB 2026

सकाळ

# रसायनशास्त्र विभागाची आज आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (ता. १४) 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत उपाय' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. झेक रिपब्लिक येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. इंद्रजित घोष यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात येणार असून, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थित असणार आहेत. परिषदेत प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), आदी नामवंत शास्त्रज्ञ उपस्थित राहणार आहेत.

14 FEB 2026 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भुयारी मार्गाला गेलेले तडे धोकादायक नाहीत

## बांधकाम विभागाकडून तांत्रिक तपासणी सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ परिसरातील मुख्य इमारत व समोरच्या विभागांना जोडण्यासाठी उभारलेल्या भुयारी मार्गाच्या वरच्या रस्त्याला तडे जाऊ लागल्याने सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आल्याच्या 'लोकमत'ने दिलेल्या बातमीनंतर विद्यापीठाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे याचा खुलासा मागविला. त्यांनी या रस्त्याला गेलेले तडे संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक नसल्याचा खुलासा केला आहे. दरम्यान, याची तांत्रिक तपासणी सुरू केल्याची माहितीही त्यांनी दिली.

विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्यासाठी बांधलेल्या भुयारी मार्गाला तडे गेल्याचे वृत्त शुक्रवारी 'लोकमत'मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर विद्यापीठाच्या स्थापत्य शाखेच्या कुलसचिवांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारत प्रकल्प उपविभागाकडे खुलासा मागविला. १७ नोव्हेंबर २०२३ रोजी विद्यापीठाशी झालेल्या निविदा करारानुसार या कामासाठी कंत्राटदारावर १० वर्षांचा डिफीट लायबिलिटी पीरियड लागू आहे. त्यामुळे दुरुस्तीची कार्यवाही संबंधित कंत्राटदारामार्फत करण्यात येणार आहे. तांत्रिक तपासणी सुरू असून उपाय-योजना करण्यात येईल, असा खुलासा बांधकाम विभागाने केला आहे.

### पाणी सुकल्याचा परिणाम

काँक्रीट वा सिमेंटच्या प्लास्टरमधील ओलावा कमी झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या भेगांना 'आकुंचन भेगा' म्हणतात. पाणी सुकल्यावर काँक्रीटचे आकारमान कमी होते, ज्यामुळे पृष्ठभागावर ताण निर्माण होऊन बारीक तडे जातात. हे प्रामुख्याने चुकीचे क्युरिंग, जास्त पाणी किंवा लवकर सुकल्यामुळे घडते.

> यासंदर्भात संबंधित विभागाने शुक्रवारी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानुसार रस्त्याच्या पृष्ठभागावर आढळलेल्या या आकुंचन भेगा असून संरचनात्मकदृष्ट्या कोणताही धोका आढळलेला नाही.
>
> **हेमा ए. जोशी**, उपविभागीय अभियंता, इमारत प्रकल्प उपविभाग, कोल्हापूर

14 FEB 2026

पुढारी

# विद्यापीठात आज आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (दि. १४) 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत उपाय' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. झेक रिपब्लिक येथील शास्त्रज्ञ डॉ. इंद्रजित घोष यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार असून असून प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. परिषदेत रसायनशास्त्रावर आधारित उपायांद्वारे शाश्वत विकास, ऊर्जा आणि पर्यावरणातील जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी अभिनव व उदयोन्मुख कल्पनांच्या देवाणघेवाणीच्या अनुषंगाने विचारमंथन करण्यात येणार आहे. परिषदेत प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी, मुंबई, डॉ. दिनेश सावंत, एनसीएल, पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन, आयआयटी, मंडी आदी शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी केले आहे.

14 FEB 2026

पुढारी

# एम.एड, बी.एड.साठी अर्ज भरण्याची २४ पर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम. एड व बी.एड-एम.एड (एकात्मिक) अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. प्रवेश परीक्षेसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख २४ फेब्रुवारी आहे. एम. एड. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक पात्रता कोणत्याही शाखेतील पदवीधर व डी.एल.एड. किंवा बी.एड. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वर्षाची अंतिम परीक्षा दिलेले विद्यार्थी एम.एड.साठी तसेच बी.एड. - एम.एड. (एकात्मिक) या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या अंतिम परीक्षा दिलेले विद्यार्थी स्टेट कॉमन एंट्रन्स टेस्ट सेल, मुंबई यांच्याद्वारे घेण्यात येणाऱ्या पात्रता परीक्षेद्वारे प्रवेश घेऊ शकतात. फॉर्मची लिंक : https: /// cetcell. mahacet. org/ आहे. अधिक माहितीसाठी शिक्षणशास्त्र अधिविभागास संपर्क साधावा, असे आव्हान अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले आहे.

14 FEB 2026

पुढारी

# ७०५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ७०५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. शुक्रवारी एमबीए या अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने झाली असून १३१ विद्यार्थी उपस्थित होते. दि.१३ रोजी एमसीए ब्रीज कोर्स, फाईव्ह ईयर लॉ या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

1 4 FEB 2026

पुढारी

# अतुल देऊळगावकर यांचे विद्यापीठात सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांचे सोमवारी (दि. १६) सकाळी ११ वाजता 'साहित्य, संस्कृती, विज्ञान, माध्यमे आणि शाश्वत विकास' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. विद्यापीठाचा हिंदी विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन व लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होत आहे. याप्रसंगी हिंदी विभागाच्या प्रभारी प्रमुख प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर आणि विनायक देसाई उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

14 FEB 2026

तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ७०५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील तीन अभ्यासक्रमांचे शुक्रवारी निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आजअखेर ७०५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. शुक्रवारी सहा अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध सात परीक्षा केंद्रावर झाल्या. परीक्षांसाठी १३१ विद्यार्थी उपस्थित होते.

14 FEB 2026

तरूण भारत

# 'प्राचार्य शिवाजीराव भोसलेंचे तत्वज्ञान मानवी अर्थ उलगडणारे'

कोल्हापूर : प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या विचारांनी महाराष्ट्राच्या बौद्धिक व सांस्कृतिक जीवनाला समृद्ध केले आहे. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, कुलगुरू आणि प्रभावी वक्ते म्हणून त्यांनी वैचारिक क्षेत्रात स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटविला आहे. ते तत्त्वज्ञानाचा मानवी अर्थ उलगडणारे थोर विचारवंत होते, असे प्रतिपादन डॉ. नागोराव कुंभार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रकाश पवार होते. डॉ. कुंभार म्हणाले, संत ज्ञानेश्वर, तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचार त्यांनी समाजापर्यंत प्रभावीपणे पोहचविले.महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण परंपरेचा वारसा त्यांनी समर्थपणे पुढे नेला. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. डॉ. अरुण भोसले, प्रा. डॉ. एम. ए. लोहार, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

14 FEB 2026

तरुण भारत

# विद्यापीठातील पद्मश्री ग. गो. जाधव अध्यासनात कार्यशाळा

**कोल्हापूर :** निकोप समाजासाठी माध्यमांकडून जबाबदार लैंगिक वृत्तांकन होणे अपेक्षित आहे, असे मत पुणे येथील मानसशास्त्र समुपदेशक अबोली यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात 'लैंगिकता–जबाबदार वार्तांकन' यावरील कार्यशाळेत त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. किर्लोस्कर ऑइल इंजिन, प्रयास आणि मानस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित केली होती. प्रयास सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. तृप्ती दरक यांनी लैंगिकतेसंदर्भात वैज्ञानिक आणि शास्त्रीय माहिती दिली.माध्यमांनी लैंगिकतेसंदर्भात संवेदनशीलपणे वृत्तांकन करून सजग, समंजस आणि निकोप समाज निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन तेजश्री शिंदे हिने केले. आभार मानस संस्थेच्या अध्यक्ष स्मिता पवार यांनी मानले. याप्रसंगी माहिती आणि जनसंपर्क विभागाचे निवृत्त संचालक वसंतराव शिर्के, पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. राजश्री साकळे, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. अश्विनी पाटील, डॉ. अमोल मिणचेकर, मास कम्युनिकेशन विभाग, महावीर महाविद्यालय, सायबर, मानसशास्त्र, एमएसडब्ल्यू विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.